VP 0083

'चिरंजीवी विकास' ⑨

प्रास्ताविक

विकास म्हणजे आर्थिक विकास असे विकासविषयक चर्चेमध्ये गृहीतच धरले जाते. आर्थिक विकास म्हणजे विविध वस्तू व सेवा यांच्या उत्पादनात वाढ, सतत वर्धिष्णु होत राहणारी वाढ, वस्तू व सेवा यांची रेलचेल. मनःपूत उपभोग घेता येत असेल तर ते उच्च जीवनमान होय अशी धारणाही या सर्व समीकरणांच्या बुडाशी आहे. उपभोग म्हणत असताना ऐंद्रिय उपभोगच गृहीत धरलेला, आणि त्यांचा संबंध शारीरसुखाशी व मनोरंजनाशी तेवढा जोडलेला असतो.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडांतील अनेक देश स्वतंत्र झाले. आर्थिक विकास हे त्यांच्या स्वतंत्र सरकारांचे एक मुख्य उद्दिष्ट बनले. जगाची विकसित व प्रगत आणि मागास व अप्रगत अशी विभागणी अर्थशास्त्रज्ञांनी केली. विकास कसा घडून येतो, तो घडवून आणण्याची सगळ्यांत परिणामकारक रीत कोणती, जलद गतीने विकास घडवून आणावयाचा झाला तर त्यांतल्या विघ्नांवर एक मोठे ग्रंथालय भरेल एवढे लेखन १९५० नंतरच्या काळात केले गेले आहे.

रेलचेल, श्रीमंती या दृष्टीने आजही अमेरिका हा गरीब, अविकसित समाजांतील प्रचंड संख्येच्या मानवसमूहांच्या सनातन आकांक्षांचा नमुना आहे. जपान, जर्मनी, दक्षिण कोरिया, तैवान अशा काही अन्य देशांच्या श्रीमंतीच्या व प्रगतीच्या दिशेने चाललेल्या यशस्वी घोडदौडीने कौतुक होत असले तरी अमेरिकन समृद्धीचा पूरक आजही आहे असे म्हणणे धाडसी होणार नाही. मागास ते विकसित हा प्रवास अत्यंत थोड्या अवधीत, जलद गतीने आणि शासकीय नेतृत्वाखाली कसा साधावा या मुद्द्याच्या आकर्षणातून सोविएत रशियापासून सगळ्यांना जास्त शिकता येईल अशी आशियाई-आफ्रिकी नवस्वतंत्र राष्ट्रांची समजूत होती. पण समृद्ध अर्थव्यवस्था अमेरिकेचीच हे त्यांचेही ठाम उत्तर होते.

सधन, प्रगत व वरचढ देशांमध्ये वापरात असलेले तंत्रविज्ञान ही समृद्धीची गुरुकिल्ली आहे याविषयी बहुतेक सर्वांचे एकमत आजही आहे. या तंत्रविज्ञानातही महायुद्धोत्तर काळात वाढत्या वेगाने सुधारणा व क्रांती होत गेली आहे. अलीकडे 'उच्च-तंत्र' (हाय-टेक) हा शब्द या घडामोडींचा निर्देशक म्हणून प्रचारात आला आहे. आपल्या उद्योग व अर्थव्यवस्थेत उच्च-तंत्राचा शिरकाव व वापर किती झालेला आहे, हीपण प्रगतीची एक खूण या सर्व काळात मानली गेली.

प्रत्येक नवे तंत्रविज्ञान हे दरडोई उत्पादनक्षमतेत भर घालणारे असल्याने त्याच्या सार्वत्रिक वापरामुळे वस्तूंचे उत्पादन वाढते आणि त्याच वेळी वस्तू स्वस्तही होतात हा एका पावलीवर जगाला गेल्या दोन-अडीचशे वर्षांचा अनुभव राहिला. या कारणाने तंत्रवैज्ञानिक शोधांना व सुधारांना अंत नाही तर समृद्धी वाढण्यालाही अंत नसेल अशी सहजसाध्य धारणा बनली. सर्व जगाची एकात्म अर्थव्यवस्था बनण्याकडे तंत्रविज्ञान सर्व देशांना रेटत नेणार आणि तेवढ्याच अटळपणे वाढत्या प्रमाणावर वैपुल्य व सुखाची रेलचेल उत्पन्न करणार असे मानले गेले.

नवस्वतंत्र देशांच्या आर्थिक विकासाचे प्रयत्न अडथळ्यांच्या व अपयशाच्या फेऱ्यात सापडत राहिले तरीही अनेक वर्षे अर्थशास्त्री ज्योतिषी असेच सांगत राहिले, की जागतिक पातळीवर उत्पादनाच्या वैपुल्याचा प्रश्न खरे तर सुटलेला आहे. न्याय्य व समान वितरणाचा प्रश्नच खरा प्रश्न आहे; तो अर्थशास्त्रीय प्रश्न नसून तो सामाजिक, राजकीय व नैतिक प्रश्न आहे. अशी मांडणी लोकप्रिय व शिष्टमान्य बनली.

गरीब व मागास राष्ट्रांचा आर्थिक विकास झपाट्याने का होत नाही, याची जी विविध विश्लेषणे या काळात सादर केली गेली त्यांचे दोन प्रकार स्थूलमानाने करता येतील. एका प्रकारच्या विश्लेषणांचे निष्कर्ष असे होते की, (१) गरीब व मागास देशांतली पारंपरिक समाजरचना, संस्थात्मक जीवन व मानस हाच मोठा

अडथळा आहे. (२) या देशांचा स्वाश्रयी व स्वयंपूर्ण बनण्याचा आग्रह हाच यांच्या वेगवान वाढीच्या आड येत आहे. एकात्म जागतिक अर्थव्यवस्थेत त्यांनी त्यांच्याकडे येणारे स्थान, भूमिका व कार्य यांचा स्वीकार [illegible] व तौलनिक अनुकूलता (कंपॅरेटिव्ह ॲडव्हान्टेज) ध्यानात घेऊन विशेषीकृत उत्पादन करण्यावर [illegible] तर त्यांची अधिक वेगाने वाढ होईल. (३) यांपैकी अनेक देशांचे दारिद्र्य व मागासलेपण हे लोकसंख्येत होत राहणाऱ्या वाढीत रुतलेले आहे. सधन पाश्चात्त्य देशांमध्ये लोकसंख्यावाढ रोखली गेली असल्याने जी काही वाढ होते तिने जीवनमान उंचावत जाते. लोकसंख्येत होणारी बेसुमार वाढ नवस्वतंत्र राष्ट्रांमध्ये होणारी आर्थिक वाढ सतत गिळंकृत करीत राहात आहे. लोकसंख्येवर मर्यादा घातली नाही तर दारिद्र्य, बेकारी यांचे उच्चाटन कधीच होणार नाही. तात्पर्य, या प्रकारच्या विश्लेषणांमधून गरिबी, मागासलेपण, विषमता, बेकारी या सगळ्यांचे खापर त्या त्या समाजांवरच फोडले जात राहील.

या विरुद्ध विश्लेषणांचा एक प्रकार असा राहिला की ज्यामध्ये जागतिक व देशांतर्गत, दोन्ही पातळ्यांवरील अर्थ व समाजव्यवस्थांच्या अंगभूत विषम वर्गीय रचनेमुळे गरिबी, मागासलेपण, विषमता व बेकारी या गोष्टी टिकून राहतात; इतकेच नाही तर, त्या बुद्धया टिकवून धरल्या जातात, असे प्रतिपादन आग्रहपूर्वक केले जाते. या निष्कर्षात पुष्कळ अधिक तथ्य आहे यात काही शंका नाही.

या दोन्ही प्रकारच्या विश्लेषणांची विकास कशाला म्हणावयाचे, त्याचे मोजमाप कसे करावयाचे, त्याची पायाभूत प्रक्रिया कोणती, यांसारख्या प्रश्नांची गृहीत उत्तरे सारखीच होती. मुख्य म्हणजे पृथ्वीवरील साधनस्रोत निरंतर पुरवठ्याला पडणारे आहेत, रेलचेल समृद्धीवरील खरी मर्यादा साधनस्रोत नसून विज्ञान-तंत्रविज्ञानातील अत्यंत तोकडी प्रगती हीच आधुनिकपूर्व प्रदीर्घ काळातील गरिबीला कारणीभूत मर्यादा होती. हे दोन्ही प्रकारच्या विश्लेषणांना समाईक असे पायाभूत गृहीत होते.

पूर्व युरोप व सोविएत रशिया यांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये, व विशेषत: गेल्या काही महिन्यांमध्ये ज्या घडामोडी घडल्या त्यांमुळे न्याय व समता प्रस्थापित करण्याचा मुद्दा असो की वेगाने विकास साधण्याचा मुद्दा असो, 'सोविएत नमुन्या'चे प्रामाण्य पार डळमळीत झाले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेची रचना विषम व अन्याय्य आहे, सधन व वरचढ राष्ट्रांचे व्यवहार स्वार्थी व शोषणाधिष्ठित आहेत, आणि दारिद्र्य व मागासलेपण टिकून राहण्याचे हे एक मुख्य कारण आहे एवढ्यापुरते डावे मार्क्सवादी विश्लेषण मान्य असणारी आज पुष्कळ मंडळी भेटतील. पण या वास्तवाचे कारण सांगून देशात सोविएत रशियाच्या धर्तीची राजकीय व्यवस्था व नियोजनाचे तंत्र स्वीकारले जावे असा पुरस्कार करणाऱ्यांची संख्या आज फारच थोडी आढळेल. सधन राष्ट्रे आपणास पूर्ण न्याय कधीच देणार नाहीत याविषयी ज्यांची खात्री पटली आहे त्यांचीही आधुनिकतम उच्च-तंत्राचा वापर करून देशांतर्गत सर्व साधनस्रोतांचे कमाल दोहन करून समृद्ध बनण्यावरच सगळी भिस्त आहे.

भारतातील सर्व राजकीय पक्ष आणि पक्षांबाहेर असलेला मोठा सुशिक्षित वर्ग यांची विकासविषयक रणनीती साधनस्रोतांचा कमाल वापर व अत्याधुनिक उच्च-तंत्राचा स्वीकार या दोन डगरींवर आधारलेली आहे. ही रणनीती यशस्वीपणे राबवून आपण वस्तू व सेवा यांच्या उपभोगाची रेलचेल निर्माण करू शकतो, आणि इतके विपुल उत्पादन प्रथम केल्यानंतरच दारिद्र्यनिवारण, समानत्वाने वाटप या गोष्टी साध्य होऊ शकतील याविषयी व्यापक एकमत आढळते.

– २ –

विकास व वाढ यांच्याविषयी काही वेगळा विचार गंभीरपणे करावयास हवा असे आरंभी दोन कारणांनी मुख्यत: म्हटले जाऊ लागले : पृथ्वीवरील काही प्रकारचे साधनस्रोत हे मर्यादित साठ्यांच्या स्वरूपाचेच आहेत आणि ते संपुष्टात येण्यामधून आर्थिक विकासावर मर्यादा येणे अटळ दिसते हा युक्तिवाद केला गेला. हा युक्तिवाद पूर्णपणे अमान्य करणे शक्यच नव्हते. उदाहरणार्थ, खनिज तेलासारख्या साधनाचे नवे साठे जरी सापडत गेले तरी, शोध लागतो तो आधीपासून असलेल्या साठ्यांचाच, तेलाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर आपण आता करू शकत नाही, या गोष्टी स्पष्ट होत्या. खनिज तेलाचा उपसा जर मोठ्या

प्रमाणावर असाच होत राहिला तर, नव्या साठ्यांच्या शोधामुळे उद्याचे मरण फार तर परवावर ढकलले जाणार. खनिज तेल जपून वापरले, ते अधिक कार्यक्षमतेने वापरले, तंत्रवैज्ञानिक सुधारणांद्वारा ते आजच्यापेक्षा अधिक 'उत्पादक' बनविले तरी साठे अंतिमतः संपुष्टात येणार ही दगडावरची रेघ राहतेच. तेव्हा साठ्यांच्या स्वरूपात असणाऱ्या साधनस्रोतांवर जर आर्थिक वाढ-विकास अवलंबून असेल तर अशा वाढ-विस्ताराला अंतिमतः मर्यादा पडणारच, हा युक्तिवाद तर्कशुद्ध होता.

"वाढविकासाला मर्यादा" ('लिमिट्स टु ग्रोथ')च्या युक्तिवादास आज शिष्टमान्यता मिळाली आहे. या युक्तिवादाने वाढविकासाला मर्यादा घालणारी जी कारणे पुढे केली त्या कारणांचा निरास कसा करता येईल यावर आज तंत्रविद्याविशारदांचे लक्ष केंद्रित झालेले आहे. ही कारणे म्हणजे मानवी प्रतिभेला व कर्तृत्वाला निसर्गाने दिलेले आव्हान होय अशा दृष्टिकोणातून पाहिले जाते. म्हणजेच हा युक्तिवाद शिष्ट-मान्यता पावल्यावरही विकासाविषयीची धारणा व भूमिका बदलली तर नाहीच; पण वाढविकास करण्याचे प्रयत्न कमी करावेत व एका स्थिर पातळीवर आर्थिक व्यवहार निदानपक्षी सधन समाजांमध्ये तरी रोखून धरावेत असाही बदल सधन राष्ट्रांच्या धोरणात झालेला नाही.

साधारण याच सुमाराला विकासाच्या आधुनिक प्रक्रियेच्या पर्यावरणीय स्वास्थ्य व समतोलावर होणाऱ्या घातक परिणामांविषयी आवाज उठविला जाऊ लागला. साधनस्रोतांचे वारेमाप दोहन करण्याच्या नादात पृथ्वीवरील निसर्गरम्य व निवान्त निर्जन प्रदेश उजाड बनत चालले आहेत, वा त्यांच्यावर अतिक्रमण होऊन ते नष्ट होत आहेत याविषयी आधीपासूनच लिहिले जात होते. निसर्गरम्य स्थळे जतन कराव्रीत या विचाराने काम करणाऱ्या संघटनाही होत्या. निसर्गरम्य स्थळांबरोबरच वन्य जीवनाच्या संरक्षणासाठी विशेष प्रयत्न सुरू झाले. मानवी वसतीचा विस्तार व साधनस्रोतांसाठी कोठेही जाऊन ते ओरबाडून घेण्याचे धोरण यामुळे अनेक वन्य प्राणिजातींचा विनाश ओढवत आहे याची माहिती निसर्गप्रेमी मंडळी नाटचपूर्ण व प्रभावी रीत्या ठेवू लागली होतीच. पण बिघडणाऱ्या पर्यावरणीय समतोलाचा, हवा-पाणी-अन्नपदार्थ यांच्या प्रदूषणाचा मानवी जीवनावरही घातक आघात होत असल्याचे स्पष्ट झाले तसा या मुद्द्याचा अधिक गंभीर-पणे विचार करण्याकडे कल निर्माण झाला. सजीव सृष्टी धारण करण्याची क्षमता असलेली नाजूक, गुंता-गुंतीची, चिरंतन पुनर्निर्मितिक्षम पर्यावरणीय व्यवस्था म्हणजेच/पृथ्वी हे नवे आकलन तीव्रपणे झाले आणि या अंगाने पृथ्वी या व्यवस्थेचा गंभीरपणे अभ्यास करण्यास चालना मिळाली. या अभ्यासामधून असे लक्षात आले की आर्थिक विकासाची आधुनिक प्रक्रिया, निरंतर आर्थिक वाढ करण्याचे उद्दिष्ट आणि पर्यावरणीय स्वास्थ्य व समतोल यांचे सख्य विळयाभोपळ्याचे आहे.

आर्थिक वाढ-विकासाविषयी अगदी वेगळ्या दिशेने विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यात एक पेच प्रथमतःच उपस्थित झाला. अगदी वेचक असे सधन देश सोडले तर इतर देशांतील बहुसंख्य लोकांना आर्थिक विकासाची नितान्त गरज आहे याविषयी जवळपास एकमत होते. दारिद्र्यनिवारणासाठी आणि आधुनिक काळाला साजेसे असे समृद्ध जीवन जगता येण्यासाठी. म्हणजे, आज सधन असलेल्या देशांचा आणखी जास्त विकास करावयाचे थांबवले ('झीरो ग्रोथ') तरी जगातील उर्वरित देशांचा तुल्यबल विकास साधण्याच्या ओघात पर्यावरणाचा समतोल पार ढासळणार हे स्पष्ट होते. अगदी अमेरिकेतल्या मध्यमवर्गीय सुखवस्तू ('अॅफ्ल्युअंट मिडल क्लास') कुटुंबाचे जीवनमान ही कमाल पातळी सर्वांसाठी पुरेशी मानली तरी लागणारे साधनस्रोत प्रचंड होते व या सर्व साधनस्रोतांचा वापर करून केल्या जाणाऱ्या उत्पादनातून होणारे प्रदूषण अनेकपट अधिक होणार होते. पण सधन समाजात 'शून्य वाढी'ची कल्पना मान्य होणार नाही ही गोष्टही सूर्यप्रकाशाहून अधिक स्पष्ट होती.

'तिसऱ्या जगा'तील समाजांनी विकासाची आकांक्षा बाळगू नये असे सांगण्याचे धाडस अर्थातच कोणी करू धजत नव्हता. या पेचाला बगल देण्याचेच वेगवेगळे प्रयत्न आजवर केले गेले आहेत. एका साधनाचा साठा संपत येईतो त्याला बदली म्हणून अन्य साधनस्रोत वैज्ञानिक संशोधनाद्वारे हाताशी येत राहील अशी आशावादी भूमिका मांडली जाऊ लागली. कचरा, प्रदूषण, पृथ्वीवरील उष्णतेत / तपमानात

यांसारख्या आपत्तींवर तंत्रवैज्ञानिक उतारा आहे व आज नसलाच तर उद्या सापडेल असे आत्मविश्वासपूर्वक सांगितले जाऊ लागले. आणि सर्वांत मोठे शुभवर्तमान म्हणून असे सांगितले जाऊ लागले की, ऊर्जास्रोत जर अमर्याद असतील तर अंतिमतः सारे प्रश्न कायमचे सोडविले जाऊ शकतात; आणि, अणूच्या पोटात दडलेली ऊर्जा वेठीला धरण्याचे तंत्र हस्तगत झाल्यासारखेच असल्याने, नजीकच्या भविष्यकाळात मानवावर बंधने आणणारी सारी कारणे कायमची निकालात निघणार आहेत. या भूमिकेनुसार आपली आगगाडी वाढ करीत राहण्यास साधन सामग्रीजनांना पूर्ण सोकळीक मिळत असल्याचे तेही खूष आहेत आणि आज नाही तरी उद्या आपणास अमेरिकेइतकेच समृद्ध जीवन उपभोगावयास मिळणार म्हणून 'तिसऱ्या जगा'तील शिक्षित धुरीणवर्गही खूष आहेत. आधुनिक विकासवादी मंडळींमध्ये जगभर ही भूमिका अर्थातच बहुविध लोकप्रिय आहे.

ही भूमिका पेचाला बगल देणारी आहे असे का म्हणावयाचे ? याचे मुख्य कारण असे की, कमी-काळाच्या दूरवरच्या भविष्यात अणू या भूमिकेतली ऊर्जेची अमर्याद उपलब्धता, साधनस्रोतांचा व संपत्तीचा पुरवठा, तंत्रविज्ञानाच्या साहाय्याने प्रदूषण दूर करणे व कचऱ्याची विल्हेवाट लावणे इत्यादी गृहीतकांबद्दलची गृहीते खरी ठरणार असे मानले तरी, येत्या शतकपन्नास वर्षांमध्ये तरी ती खरी ठरणारी नाहीत. आजच काही कारणांनी उग्र रूप धारण केले आहे; आणि आजच्याच दिसेने व वेगाने जर आणखी विकास झाला तर कडेलोट अवघड नाही. विशेषतः 'तिसऱ्या जगा'तील दारिद्र्यरेषेच्या खाली वास करणाऱ्या कोटयवधी लोकांचे जीवन अशक्य होईल ही खोट अनुभवास येत आहे.

— ३ —

विकासाच्या आधुनिक प्रक्रियेविषयी, विकासवादी भूमिकेत गृहीत धरलेल्या उद्दिष्टांविषयी ज्या आणखी एक कारणाने शंका उपस्थित झाली आणि फेरविचाराला चालना मिळाली तिचा येथे विचार करावयास हवा. दारिद्र्य, बेकारी, विषमता, शोषण यांचे उच्चाटन करण्यासाठी आर्थिक विकास सर्वसत्तावादी राष्ट्रांमध्ये हाती घेण्यात आला. आर्थिक विकास साधला जाईल तसे औद्योगिक दृष्ट्या जीवनमान उंचावले तर जाईलच पण अन्य कसोटयांवरही ऐहिक जीवनाची गुणवत्ता वाढेल अशी अपेक्षा होती. आर्थिक विकास-वाढीची जी प्रचलित शिष्टसंमत गमके आहेत त्यानुसार गेल्या चाळीस वर्षांमध्ये भारताने केलेली वाटचाल लक्षणीय आहे. आणि तरीही वरील उद्दिष्टांची पूर्तता दृष्टीच्या टप्प्यात आलेली नाही. उत्पादनयंत्रणेतून निर्माण होणारी समृद्धी शिरपूत समाजातल्या तळागाळाच्या लोकांपर्यंत पोचत राहून सर्वांना एक किमान जीवनमान तरी उपलब्ध होईल, सर्वांना रोजगार मिळेल याची आशा चाळगत येणार नाही एवढे आज स्पष्ट झाले आहे. खेडी पूर्णपणे मोडली नाहीत आणि शहरे जी वाढली त्यांतील जीवन अकाल, कुरूप व हिंस्र बनले आहे.

सर्वांना रोजगार देणे, सर्वांना दारिद्र्यातून मुक्त करणे, जीवन सुंदर व सुसंस्कृत बनवणे ही कसोटयावर आधुनिक विकासप्रक्रियेची, विकासाच्या नावे निवडलेल्या साधनमार्गाची मुळात पश्चिमी देशांमध्ये तरी उद्दिष्टे होती का ? औद्योगिक क्रांती, विज्ञान-तंत्रविज्ञानातील शोध व त्यांचा वापर, निरंतर उत्पादनवाढ यांच्यामागील वास्तविक प्रेरक शक्ती कोणत्या होत्या, व आजही आहेत ? कार्ल मार्क्स व महात्मा गांधी यांनी त्यांच्या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने व परिभाषेत पाश्चात्य जगातील या घडामोडींचे अत्यंत चोखंदळ वास्तववादी परीक्षण केले. ते जर यथार्थपणे जाणून घेतले तर सत्ता व मत्ता यांचे अमर्याद व अखंड केंद्रीकरण, सत्ता व मत्ता यांच्या उपभोगाची अमर्याद वाढ्या याच आधुनिक काळातील व्यापार व उद्योग यांमागील वास्तविक प्रेरक शक्ती राहिल्या आहेत व तीच त्यांची अंतिम उद्दिष्टे पण आहेत हे स्पष्ट होईल. हे दोन महाभुतयांच्या, दुष्टचक्रांना झाले. हे एक दुष्टचक्र आहे आणि ते छेदले नाही तर मानवजातीचा व माणुसकीचा विनाश अटळ आहे, या निष्कर्षाला ते आले.

हे दुष्टचक्र गतिमान करणाऱ्या मांडवलदार ('बुर्जुआ') वर्गाचीही अवस्था अगतिक बनते, व हे चक्र त्याच्या स्वतःच्या मती व विकासशास्त्रानुसार फिरू लागते, आणि या चाकाच्या हँडलवरचा हात मांडवलदार वर्गालाही काढता येत नाही, ही खोट मार्क्सच्या मार्मिक दृष्टीने हेरली. या चक्राच्या वेगवान फेऱ्यांमध्ये

भरडला जाणारा वर्ग संघर्षाच्या मार्गाने भांडवलदारांच्या हातून प्रभुत्व व नियंत्रण काढून घेईल असे भाकित त्याने केले. भांडवलदारवर्गाचे प्रभुत्व व नियंत्रण नष्ट करावयाचे म्हणजे केवळ सत्तान्तर करावयाचे नाही तर हे दुष्टचक्रही तोडावयाचे हे जरी गृहीत असले तरी, प्रत्यक्ष व्यवहारात सर्व लक्ष चक्र फिरते ठेवण्याची सत्ता हस्तगत करण्यावर केंद्रित झाले. असे मानले गेले की, इंडल जर कामगारवर्गाचे नेतृत्व व प्रतिनिधित्व करणाऱ्या पक्षाच्या हाती आले तर चक्राच्या फेऱ्यांमधून दुष्ट परिणाम घडून येणे थांबेल, आणि नफेखोरीचे रूपांतर सहजच व अटळपणे सर्वांच्या हितासाठी वापरल्या जाणाऱ्या 'वाढाव्या'त होईल. खुद्द मार्क्सची समज इतकी उथळ नव्हती असे मानण्यास जागा आहे. पण इतके तर खरेच की, मार्क्सने 'उत्पादक शक्तीं'चा (म्हणजे आजच्या परिभाषेत 'विज्ञान-तंत्रविज्ञाना'चा) मानवाला मुक्त करणाऱ्या शक्ती म्हणून केलेल्या गौरवाचा, या घटकाला दिलेल्या मध्यवर्ती महत्त्वाचा परिणाम असा झाला की, आत्ताआत्तापर्यंत आधुनिक कालखंडातील 'विज्ञान-तंत्रविज्ञाना'ची, उत्पादक शक्तींची मार्क्सपद्धतीला अनुसरून इतिहासविशिष्ट (हिस्टरीस्पेसिफिक) चिकित्सा मार्क्सवादी मंडळींनी केली नाही.

सत्ता व मत्ता यांच्या लालसेमधून, अमर्याद उपभोगाच्या लालसेमधून आकारास आलेल्या या विशिष्ट ऐतिहासिक रूपातल्या उत्पादक शक्तींना जो कोणी राबवील त्याची बोली काहीही असली तरी त्या राबवणुकीतून तेच परिणाम निष्पन्न होत राहणार; या विषवृक्षाला अमृताची फळे लगडणार नाहीत, हे महात्मा गांधींचे विश्लेषण मार्क्सच्या मांडणीला अधिक नेमके व प्रगल्भ बनविणारे आहे.

मोठी लोकसंख्या असलेल्या 'तिसऱ्या' जगातील देशांमधल्या गोरगरीब लोकांना नियमित उत्पादक रोजगार देऊन त्यांचे जीवनमान उंचवावयाचे असेल तर अत्याधुनिक उच्च-तंत्रावर आधारित मोठे कारखानदारी उद्योग उभारण्याने हे उद्दिष्ट कधीच साध्य होणार नाही; कारण मूलतः श्रमिकांची संख्या कमी करून उत्पादन वाढविणे हे उच्च-तंत्रामागील सूत्र आहे. म्हणून उत्पादक रोजगार पर्याप्त प्रमाणात निर्माण करण्याच्या दृष्टीने उचित असे तंत्रविज्ञान वापरावे हा विचार अलीकडच्या काळात शूमाखर यांनी प्रभावीपणे मांडला. 'इंटरमीजीएट टेक्नॉलॉजी', 'ॲप्रोप्रिएट टेक्नॉलॉजी', 'स्मॉल इज ब्युटिफुल' हे शब्दप्रयोग त्यांच्यामुळे रूढ झाले. उच्च-तंत्रावर आधारित अत्याधुनिक स्वयंचलित उद्योग उभारण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाच्या तुटवड्याच्या समस्येवरही यात प्रभावी तोडगा सापडू शकत होता. विषम, अन्याय्य व शोषक जागतिक अर्थव्यवस्थेच्या अजगरी विळख्यात सापडण्यातून गरीब देश वाचू शकणार होते. स्थानिक पातळीवर लोकांच्या पायाभूत, प्राथमिक गरजांची 'स्वदेशी'च्या व 'शेजारधर्मा'च्या तत्त्वांवर पूर्तता करण्यावर या भूमिकेचा भर होता. स्थानिक साधनस्रोत, स्थानिक श्रमशक्ती व स्थानिक गरजा यांचा मेळ घालण्याचे महत्त्व या भूमिकेत प्रतिपादिलेले होते.

अलीकडच्या काळात सधन व प्रगत देशांमध्येही गरिबी, बेकारी व शोषण यांचे प्रश्न सुटलेले नाहीत ही गोष्ट लक्षात आलेली आहे. देशांतर करून, 'तिसऱ्या जगा'तून देशांतर करून सधन व प्रगत देशांमध्ये जाणारा, तेथे कष्टाची कामे करून पोट भरणारा एक वर्ग अनेक देशांमध्ये अस्तित्वात आलेला आहे. यांचे विशेष शोषण होत असते, अशीही माहिती समोर येत आहे. म्हणजे, सर्वांना काम व मुक्त जीवनमान मिळवून देण्याच्या दृष्टीने विकासाच्या आधुनिक प्रक्रियेच्या अंगभूत मर्यादा खुद्द या अर्थव्यवस्थांच्या संदर्भातही उघड्या झाल्या.

– ४ –

औद्योगिक क्रांतीनंतरच्या काळातल्या तंत्रवैज्ञानिक घडामोडींनी माणसाला निसर्गसृष्टीपासून मनाने हळूहळू दूर नेले आहे. विशेषतः सजीव सृष्टीपासून. शहरी माणसाचा सजीव सृष्टीशी जिवंत व घनिष्ठ संपर्क कमी कमी होत चालला आहे. आपल्या वापरातल्या जास्त जास्त वस्तू कारखान्यांमध्ये तयार होऊन, कागदी, प्लॅस्टिक वा काचेच्या खोक्यां/बाटल्यांमधून बाजारात विकत मिळतात. दूध, अंडी, अन्नधान्य यांसारखे पदार्थही अशा पद्धतीने मिळतात की जणू सर्वस्वी कारखान्यांमध्येच त्यांचे उत्पादन अथपासून इतिपर्यंत केले असावे असे वाटावे. कृत्रिम रासायनिक स्वरूपात अन्नपदार्थ निर्माण करण्याच्या गोष्टी गंभीरपणे केल्या

जाताना आपण पाहतो. आणि अशा प्रकारे तयार केलेल्या काही गोष्टी आपल्या प्रचारात आजही आलेल्या आहेत. जीवनसत्त्वांच्या गोळ्या, अनेक औषधे, टाटाचे मीठ अशी उदाहरणे देता येतील. या सगळ्यांचा परिणाम म्हणून कळत-नकळत अशी समज दृढ होत चाललीय की दैनंदिन भरणपोषण आणि समृद्धी यांच्यासाठी लागणाऱ्या प्राथमिक उत्पादनांसाठीही नजीकच्या भविष्यकाळात आपल्याला निसर्गातील सजीव उत्पादक व्यवस्थेचा आधार अनावश्यक ठरेल. वेगवेगळी मूलद्रव्ये खनिजांच्या रूपांत अस्तित्वात आहेत, त्यांचे रूपांतर आपण हव्या त्या पदार्थांमध्ये तंत्रविज्ञानाचा वापर करून करू शकतो.

अर्थात आजच्या घडीला अत्यंत सधन व उच्च-तंत्रात प्रगत अशा राष्ट्रांनीही सजीव निसर्गसृष्टीचा आधार सोडलेला नाही. कापड, कागद, इमारती सामान, फर्निचर आदी गरजांच्या पूर्ततेसाठी जंगलांवरचे अवलंबन शून्यवत झाले आहे असे या राष्ट्रांच्या बाबतीतही दिसत नाही. त्यांना लागणारे अन्नही ते शेती व पशुपालनाद्वारेच निर्माण करीत आहेत. पण या धारणेचा व्यवहारात परिणाम असा झाला आहे की सजीव सृष्टीतूनही, खाणींमधून खनिजे काढावीत तसा 'कच्चा माल' काढून घेणे चालले आहे. सजीव सृष्टीची उत्पादकता अन्योन्याश्रयी चक्रांच्या फिरत राहण्यावर, साखळ्यांमधील दुवे टिकून राहण्यावर, घटकांच्या परस्परसंतुलनावर अवलंबून आहे ही गोष्ट विज्ञानाच्या पातळीवर माहीत असूनही चक्रे खंडित करण्याबद्दल, दुवे तोडण्याबद्दल, असमतोल निर्माण करण्याबद्दल आर्थिक वाढीची आधुनिक प्रक्रिया बेपर्वा व बेदरकार आहे.

पण जगातल्या वरचढ, श्रीमंत व उच्च-तंत्रात प्रगत देशांचा व्यवहार स्वदेश व इतर जग यांच्या बाबतीत असमान आहे. हे सर्व देश साम्राज्यसत्ता आहेत आणि वासाहतिक शोषणाला ते सरावलेले, चटावलेले देश आहेत. सोवियत रशिया आणि चीन हेही याच पद्धतीने व्यवहार करतात हे ध्यानात घेतले पाहिजे. परिणाम असा झालाय, की तिसऱ्या जगा'तील अनेक अर्थव्यवस्था व समाज यांचे अस्तित्वच संकटात सापडले आहे. कारण हे समाज आजही प्रामुख्याने स्वत:च्या भूमीतील सजीव सृष्टीच्या उत्पादकतेवरच अवलंबून आहेत; जगभरचे साधनस्रोत ते ओरबाडून आणू शकत नाहीत. आर्थिक विकासाच्या आधुनिक भूमिकेचा अंगीकार करून विकास व प्रगती वेगाने साधण्याचे लक्ष्य समोर ठेवून त्यांनी सधन देशांतील व स्वकीय तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार आपल्या साधनस्रोतांचे सौदे करून स्वत:च्या हाताने स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे. याची खरी झळ या 'विकसनशील' देशांमधील तळागाळाच्या वर्गांना व त्यातही गोरगरीब स्त्रियांना सर्वांत अधिक सोसावी लागत आहे. या सर्व देशांमध्ये दुटप्पी अर्थव्यवस्था अस्तित्वात आल्या आहेत. एका बाजूला शहरे आणि दुसऱ्या बाजूला ग्रामीण भाग अशी विभागणी दिसून येते.

जगभर ग्रामीण भागातल्या तळागाळातल्या जनतेचे अस्तित्वच धोक्यात येण्याची प्रक्रिया अशी उग्र बनत गेलीय, की तीमुळे विकासाच्या आधुनिक भूमिकेवर व प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह लागले आहे.

– ५ –

कळीचा एक प्रश्न विज्ञान-तंत्रविज्ञानाचे वळण आणि वापर यांचा आहे. आपण वर पाहिले त्याप्रमाणे आधुनिक काळातील आर्थिक वाढ-विकासाचे मुख्य हत्यार "उत्पादक शक्ती" राहिल्या आहेत.

मूठभर हिकमती, कर्तृत्ववान उद्योजक-व्यापारी यांच्या हाती सत्ता व मत्ता केंद्रित करण्याच्या दृष्टीने विकसित केल्या गेलेल्या "उत्पादक शक्तीं"चा अव्हेर करावयाचा म्हणजे त्या विशिष्ट तंत्रवैज्ञानिक शोधांमध्ये ग्रथित विज्ञान नाकारावयाचे असा होत नाही हे खरे. पण 'वैज्ञानिक ज्ञाना'ची वैज्ञानिकता आणि त्या ज्ञानाचे स्वरूप व मर्यादा यापण तपासून घ्यायला हव्यात.

हा मुद्दा समजणे, पटणे फार अवघड जाते. याचे मुख्य कारण असे आहे, की आजच्या विज्ञान-तंत्रविज्ञानाने जी 'समृद्धी' निर्माण केली आहे तिची आपल्या मनावर विलक्षण पकड आहे. पुष्कळदा असे म्हटले जाते की, पूर्वीच्या काळी सम्राटांना, राजेरजवाड्यांनादेखील जी सुखे उपलब्ध नव्हती त्यांचा आज अनेकविध वस्तू व सेवा यांच्या उपभोगाद्वारा मध्यमवर्गीय माणसे आस्वाद घेऊ शकतात याचे सर्व श्रेय

विज्ञान-तंत्रविज्ञानाला आहे; तंत्रविज्ञानाच्या रूपाने सामान्य माणसाच्या दिमतीला, सेवेला अनेक गुलाम सदैव हजर असतात. या म्हणण्यात तथ्य नाही असे कोण म्हणू शकेल ?

सुख, समृद्धी यांचा विचार करताना, या शब्दांच्या व्याख्या करताना आपल्या डोळ्यांसमोर राजेरजवाडे, धनिक हे आदर्श म्हणून असावेत येथेच ग्यानबाची मेंख आहे. कोणाचेही शोषण न करता, कोणावरही अन्याय वा जुलूम न करता, कोणालाही कमी वाटा न देता प्रत्येकाला सुखी व समृद्ध जीवनमान उपलब्ध करून देण्याची गुरुकिल्ली म्हणजे आधुनिक उच्च-तंत्र अशी मांडणी केली गेली. पण आधुनिक विज्ञान-तंत्रविज्ञान मूलतः, ऐतिहासिक दृष्ट्या व स्वभावप्रकृती दृष्ट्या, निसर्गसृष्टीचे आणि माणसांचे शोषण करण्यावरच उभारलेले आहे याचा प्रत्यय आज प्रकर्षाने येत आहे.

निसर्गसृष्टीची, विशेषतः सजीव सृष्टीची उत्पादकता प्रथम अभंग राखून आणि मग तीमध्ये निसर्गाच्याच रीतीनुसार भर घालून त्या मर्यादेत, आपला वाजवी तेवढाच वाटा घेण्याचे पथ्य सांभाळून काम करणाऱ्या विज्ञान-तंत्रविज्ञानाचा शोध भविष्यात आपणास घ्यावयाचा आहे. माणसांच्या रूपांत वा यंत्रांच्या रूपांत पण 'गुलामां'करवी सेवा करून घेण्यात सुख-समृद्धी आहे ही मान्यताच यासाठी आपणास सोडून द्यायला हवी. वेगळ्या भाषेत हा मुद्दा मांडावयाचा तर, कोणत्याही पातळीवर, 'वाढावा हस्तगत' ('सरप्लस एक्स्ट्रॅक्शन') करण्याच्या पद्धतीने आपली सुख-समृद्धी संपादित न करण्याचे पथ्य सांभाळले जाईल असे विज्ञान-तंत्रविज्ञान आणि अशी राजकीय-आर्थिक व्यवस्था आपणास विकसित करावयास हवी.

उदाहरणार्थ, ऊर्जेच्या वापराचा मुद्दा घेऊ या. अंतिमतः पृथ्वीवरील सर्व जीवनाचा आधार सूर्यापासून मिळणारी ऊर्जा हा आहे असे विज्ञान सांगते. सूर्यापासून पृथ्वीला मिळणाऱ्या ऊर्जेपैकी अत्यंत अल्प अंश तेवढाच आज वापरला जातो. सौरऊर्जेचे रूपांतर वनस्पतींच्या साहाय्याने वा अन्य प्रकारे करून ऊर्जेची उपलब्धता वाढविण्याला पुष्कळ वाव आहे असे दिसते. यावर मर्यादा अशी की ऊर्जेची निर्मिती करताना तिच्या वापरातून पृथ्वीच्या जीवनधारणक्षमतेवर विपरीत आघात होणार नाही हे पहावयास लागेल. अणूच्या पोटातील ऊर्जा मुक्त करून वापरण्याच्या संदर्भातही हेच पथ्य सांभाळायला हवे. तेच पथ्य जलविद्युत् व औष्णिक विद्युत्निर्मितीसही अर्थातच लागू आहे. हे पथ्य सांभाळून अधिक ऊर्जा उपलब्ध करून घ्यावयाची असेल तर वैज्ञानिक संशोधन व तंत्र-वैज्ञानिक शोध या दोहोंचे वळण व रोख बदलतो. अभ्यासाच्या सोयीसाठी आपण तुकडे पाडून प्रयोगशाळेत कार्यकारणसंबंध प्रस्थापित करीत असलो तरी समग्र व्यवस्थेच्या दृष्टीने अन्योन्याश्रयामधून राखला जाणारा गतिमान समतोल आणि समग्र निसर्गव्यवस्थेचे (पृथ्वीचे) स्वास्थ्य यांच्या चौकटीत ते आंशिक ज्ञान कोठे व कसे 'बसते' याचे भान सतत राखले जाईल. आंशिक ज्ञानाची आंशिकता, व म्हणून त्या ज्ञानाचा सरळसरळ वापर करण्याविषयीची मर्यादा यांची जाण हाही वैज्ञानिक ज्ञानाचा एक महत्त्वाचा व अंगभूत घटक मानला जाईल. याचा व्यावहारिक पैलू असा की, आंशिक ज्ञानावर तंत्रविज्ञान विकसित केले जाणार नाही. साकल्याने विचार करता त्याची गरज आहे की नाही, व ते उपकारक आहे की नाही या महत्त्वाच्या कसोट्या ठरतील.

शक्यता अशी आहे की भविष्यात सर्वसामान्य माणसे आजच्यापेक्षा जास्त ऊर्जा वापरतील; कारण त्यांच्या त्यांच्या ठिकाणी व परिसरामध्ये ऊर्जेची निर्मिती व साठवणूक करण्याच्या नैसर्गिक रीती त्यांनी हस्तगत केलेल्या असतील. त्याचबरोबर ही गोष्टही शक्य आहे, की बरीच वीज खर्च करून साध्य केल्या जाणाऱ्या अनेक गोष्टी वेगळ्याच प्रकारे साध्य करण्याची रीत उमगल्याने विजेच्या स्वरूपातील ऊर्जेची गरज आजच्यापेक्षा कमीपण होईल.

येथे आजच्या विकासाच्या नमुन्याचा आणखी एक घातक विशेष ध्यानात येतो. विजेच्या स्वरूपात ऊर्जेची निर्मिती वाढत जाणे व तिचा वापरही वाढत जाणे याच प्रगती, वाढ व विकास यांच्या कसोट्या बनतात व विजेचा वाढता वापर व सुखसमृद्धी यांचे समीकरण घातले जाते. वीज हा ऊर्जेचा एकमेव प्रकार नाही, ऊर्जा हेही एक साधन आहे आणि सुख व समृद्धी यांचा व ऊर्जा या साधनाचा संबंध नेहमी साधनाला गौणत्व देणारा असला पाहिजे (म्हणजे साध्यानुरूप साधन असायला हवे, साधनानुरूप साध्य निश्चित होता

कामा नये) हे भान आजची विकासविषयक भूमिका विसरायला लावणारी आहे. तंत्र माणसाला गुलाम बनवते ते असे.

तात्पर्य असे की, भारतासारख्या गरीब व विषम समाजातदेखील मध्यम व उच्चभ्रू वर्गांच्या अंग-बळणी पडलेल्या 'सुख-समृद्धी'ची, यंत्रतंत्रांची हमी देणाऱ्या विकासाच्या नमुन्याला बांधिलकी व्यक्त करणे शक्य नाही याचा अर्थ आधुनिकपूर्व काळातील जनसामान्यांच्या कावाडकष्टी व अस्थिर जीवनसरणीचे पुनरुज्जीवन असा घेण्याचे काही कारण नाही. विज्ञान-तंत्रविज्ञान यांना भविष्यात काम आहेच. उत्पादक शक्तींचा तोंडवळा व रोख अगदी वेगळा असेल ही गोष्ट मात्र खरी.

— ६ —

दुसरा मुद्दा आहे तो वासाहतिक शोषणाच्याशिवाय विकास साधण्याचा. वासाहतिक शोषण एक देश दुसऱ्या देशाचे करतो असेच केवळ नाही. देशांतर्गतही आज याच पद्धतीने विकास चालू आहे. कारण आधुनिक विकासाची प्रक्रिया शोषणाद्वारा 'वाढावा' निर्माण करीत राहण्यावरच उभारलेली आहे.

या संदर्भातला आजचा कळीचा प्रश्न आहे विकासाच्या ओघात विस्थापित वा उद्ध्वस्त होणाऱ्या लोकांच्या मानवी प्रतिष्ठेचा व अधिकारांचा. मोठी धरणे, खाणी, आण्विक ऊर्जाप्रकल्प व अशाच अनेकानेक विकास प्रकल्पांमुळे विस्थापित केल्या जाणाऱ्यांचाच यात केवळ समावेश नाही. आपापल्या पिढीजाद खेड्यां-मध्ये कामधंदा न उरल्याने, शेती उजाड बनल्याने, कामाच्या शोधात शहरांमध्ये वसतीस येणाऱ्यांचाही यात समावेश आहे. वर्षातून काही महिने स्थलांतर करणाऱ्या ऊसतोडणी कामगार-कुटुंबांचाही यात समावेश आहे. तसा पोटापाण्यासाठी नव्याने कायम भटके जीवन पत्करावे लागलेल्यांचाही.

अनेकांना बेदखल केले जाते तर अनेक स्वतःच घरेदारे, गावे सोडून जातात. जे स्वेच्छेने स्थलांतर करतात त्यांनी ते स्वेच्छेने केलेले असल्याने ती गोष्ट 'स्वतःची परिस्थिती सुधारण्यासाठी, विकासासाठी दाखविलेला अभिक्रम' या सदरात ती टाकली जाते. आधुनिकतेच्या समाजशास्त्रात 'सामाजिक चलनवलन' असे नाव या धडामोडीला दिले जाते. ही आधुनिकतेची, प्रगतीची, विकासाची खूण मानली जाते.

विस्थापितांबद्दल तर समाजात सहानुभवाचा अभावच आढळतो. विशेषतः विस्थापित हे तळामाळातले खेडूत वा आदिवासी असतील तर. राष्ट्राच्या विकासासाठी काही लोकांना किंमत द्यावी लागणारच व त्यांना ती द्यायला भाग पाडण्यात काही गैर नाही अशी भूमिका घेतली जाते.

राष्ट्रासाठी, सर्वांच्या व्यापक हितासाठी व्यक्तींनी, काही समूहांनी त्याग करण्याची तयारी ठेवावयास हवी अशी भूमिका घ्यावयास हरकत नाही. पण समजूनउमजून स्वयंनिर्णयाने केला तरच तो त्याग ठरतो. त्याग करावयाचादेखील कर्तव्य व अधिकार माझा असतो. ज्यांनी त्याग करावा अशी अपेक्षा असते त्यांना मग, राष्ट्राचे म्हणजे कोणाचे हित व ते कसे, आणि राष्ट्रातील इतरेजन त्यांच्याप्रमाणेच कोणता त्याग करीत आहेत, असे प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार पोचतो. आज हा अधिकार दिलेला नाही.

समाजाचा कारभार चालवावयाचा तर प्रसंगी सक्तीने काही गोष्टी राज्याची धुरा वाहणाऱ्यांना कराव्या लागतात, त्या करणे त्यांचे कर्तव्य असते व तो अधिकार लोकांनीच राज्यकर्ते म्हणून निवड करताना त्यांना दिलेला असतो, असा युक्तिवाद करता येईल. हा युक्तिवाद मान्यही करण्यात अडचण नाही. पण समतेचे तत्त्व आपण स्वीकारलेले असेल तर अशी सक्ती केली जाण्यात भेदाभेद केला जात नाही हे काटे-कोरपणे पाहिले जावे अशी अपेक्षा असेल. दुसरी गोष्ट अशी की, सक्ती करण्याची गरज आहे ही गोष्ट ज्यांच्यावर सक्ती केली जाते त्यांनाही मनोमन पटली पाहिजे.

उदाहरणार्थ, आपण नर्मदेवर बांधल्या जाणाऱ्या सरदार सरोवर धरणाने विस्थापित होणाऱ्यांचा विचार करू. सक्तीने गावेच्या गावे उठविणे समर्थनीय कधी ठरेल, असा प्रश्न उपस्थित होईल. आपली गावे, घरेदारे, जमिनी राजीखुशीने सोडण्यास तयार न होण्यात स्वार्थीपणा आहे, स्वार्थीपणातून उत्पन्न होणारा आडमुठा कोतेपणा आहे ही गोष्ट बुडक्षेत्रातील हजारो माणसांना पटवून देता आली पाहिजे. याचा अर्थ असा की; जी ध्येये याही लोकांनी स्वीकारलेली आहेत, जी मूल्ये व तत्त्वे यांच्यावर त्यांची निष्ठा आहे त्याच

तत्त्वांच्या, मूल्यांच्या व ध्येयांच्या कसोटीवर धरणास विरोध करणे असमंजसपणाचे व तत्त्वशून्य आहे हे दाखवून देता आले पाहिजे. आपल्या अंगचा सदसद्विवेक धरणाच्या समर्थक शासनाचा युक्तिवाद खोडून काढू शकत नाही आणि तरीही आपण विरोध करीत आहोत याचे भान विचारी व प्रामाणिक लोकांमध्ये उत्पन्न झाल्याचे प्रत्ययाला आले पाहिजे. सक्ती करण्याचा नैतिक अधिकार असलेल्या व्यक्तींनी–राज्यकर्त्यांनी–आपणावर सक्ती करणे योग्यच आहे असे मनोमन पटले पाहिजे.

'राष्ट्रीय स्वयंनिर्णया'चे तत्त्व ब्रिटिशांच्या उदारमतवादी विचारप्रणालीचे एक अंगभूत तत्त्व होते आणि हे तत्त्व ब्रिटिश साम्राज्यसत्ता भारतीयांना नाकारू शकत नाही, असे स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करणाऱ्यांचे म्हणणे होते. सत्ता गाजविणाऱ्या अनेक ब्रिटिश राज्यकर्त्यांनाही हा युक्तिवाद खोडून काढता येत नव्हता. भारतीयांचा स्वातंत्र्यलढा योग्य व समर्थनीय आहे याची कबुली त्यांच्याकडून मिळतही होती. त्याच वेळी दुसरीकडे या संपूर्ण कालखंडात इतर अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांची व राजकारण्यांची भूमिका अशी होती की, तत्त्व, सदसद्विवेक हे मुद्दे गैरलागू आहेत; आपण हिंदुस्थानचे राज्य तलवारीच्या जोरावर संपादित केले आहे व म्हणून स्वतःच्या स्वार्थासाठी भारतीय लोक व भारतातील साधनसंपत्ती यांचा वापर करून घेणे हा आपला अधिकारच आहे. मात्र न्यायाने, घरेदारे, जमीनजुमला, गावे-प्रदेश सोडून दूरवर जाणे, इतरही काही गमावणे याला विरोध करणे स्वार्थाच्या विरोधी असले तरी त्याची तयारी दाखविणे उच्चतर नैतिक कर्तव्य आहे असे विस्थापितांपैकी विचारी व तत्त्वनिष्ठ मंडळींना पटवून देता आले पाहिजे.

शासनाने प्रकल्पाला मंजुरी दिली आहे याचा अर्थ तो प्रकल्प राष्ट्रहिताचा आहे असे जणू काही सिद्ध झाले आहे असे मानले जाते. आणि शासनाने प्रकल्पग्रस्तांना तुकसानभरपाई दिली की विस्थापितांच्या संदर्भातले शासनाचे कर्तव्य संपले असेही मानले जाते.

राष्ट्रहिताच्या नावे घेतल्या जाणाऱ्या प्रकल्पाने साधारणतः समाजातील काही व्यक्ती, गट व समूह यांना फायदा होणार असतो. प्रकल्पउभारणीच्या टप्प्यापासून काहींच्या पदरात लाभ पडण्यास सुरुवात होते. ही गोष्ट ध्यानात घेऊन, 'राष्ट्राचे हित' या मोघम सांडणीचे खोलात जाऊन पृथक्करण करून लाभ पदरात पडणाऱ्यांची ओळख पटवून घेतली पाहिजे. एकाचा लाभ हा दुसऱ्याची हानी अशी स्थिती जर होणार असेल तर ते अन्यायाचे तर आहेच, पण असे होऊ देण्याचे समर्थनही होऊ शकत नाही.

नर्मदेवरील सरदार सरोवर धरणाचे लाभ कोणाला मिळणार आहेत हे चांगलेच स्पष्ट आहे. राष्ट्रहितासाठी त्याग करायला, सक्तीने बेदखली मान्य करण्याला मान्यता द्यायला ज्यांना भाग पाडले जात आहे त्यांनी जर प्रश्न केला की, राष्ट्रहितासाठी सर्वांनाच समानत्वाने त्याग करावयास भाग का पाडले जात नाही, तर ते योग्यच ठरते. म्हणजेच, विकासप्रकल्पांच्या बाबतीत तरी, विकासप्रकल्पांमुळे सर्वांना लाभच झाला पाहिजे, झालेला दिसला पाहिजे ही गोष्ट एक तत्त्व म्हणून मान्य व्हायला हवी. जर राष्ट्रहितासाठी विकासप्रकल्प असेल तर त्या राष्ट्रहितामध्ये आमचाही रास्त वाटा असला पाहिजे, आणि तो लाभाच्या पदरात पडेल अशी आमची खात्री पटली पाहिजे, अशी विस्थापित होणाऱ्यांना हक्काने मागणी करता आलीच पाहिजे.

दुर्दैवाने, विस्थापितांचे उदार शर्तींवर पुनर्वसन करण्यास कबुली दिल्याने लोकांना विस्थापित करण्याचा आपापास हक्क पोचतो अशी नवी भूमिका शासन घेत आहे. व्यवहारात या उदार शर्तींची बंगलबजावणी बीट होत राही व अनेकांचे हाल वर्षानुवर्षे चालतच राहतात. यात वास्तविक आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही. कारण अनेकांना लुबाडून, वंचित करून, दडपून, उद्ध्वस्त करूनच विकास व समृद्धी या गोष्टी साध्य केल्या जात असतात. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती भारताच्या लुटीमुळे शक्य झाली हा इतिहास ताजाच आहे. सरदार सरोवर धरणाच्या बाबतीतही धरणग्रस्तांच्या संघटनांनी सतत तीव्रतर संघर्ष केल्यामुळे पुनर्वसन होईल याची खात्री करून घेण्याचा अथक प्रयत्न केला. असेरीस आज ही गोष्ट उघड झालीच की, मान्य केलेल्या अटींवर पुनर्वसन असक्य आहे. म्हणून, कोणत्याही समाजाचा कारभार लोकशाही चालायचा असला तर असंमती सक्ती करण्याची सत्ता राज्यकर्त्यांच्या हाती आहे हे मान्य केल्यावरही, कोणाला ना कोणाला तरी उद्ध्वस्त व वंचित करून, लुबाडून विकास साधण्याच्या प्रक्रियेविरुद्धच ठाम भूमिका घ्यावयास

हवी. विस्थापित होण्याची ज्यांच्यावर पाळी येणार आहे त्यांची खातरजमा होऊन त्यांनी संमती दिल्याखेरीज विस्थापित करण्याचा शासनालाही अधिकार नाही, अशी भूमिका घेतली पाहिजे. नागरिकांच्या मूलभूत हक्कांमध्येच या हक्काचा समावेश झाला पाहिजे.

— ७ —

विकास व समृद्धी साध्य करण्याची पर्यायी रीत व साधने खरोखरच उपलब्ध आहेत का ?

विकास व वाढ या शब्दांचे अर्थ तपासून, सुधारून घेण्यापासून सुरुवात करावी लागते. निसर्गात प्राणी, झाडे, अगदी माणूस जरी घेतला तरी आपणास काय आढळते ? मूल लहानाचे मोठे होताना त्याच्या शरीराची वाढ होते, पण एका वयात ही वाढ पूर्ण होते. उंची आयुष्यभर वाढत जात नाही. वजनही जर सतत वाढत गेले तर ती विकृतीच मानली जाईल. शारीरिक वाढ पूर्ण झाल्यावर, शरीराचे स्वास्थ्य राखणे हाच शरीराच्या संदर्भात विकास, वाढ, समृद्धी यांचा अर्थ आपण करतो. कार्यशक्ती, उत्साह, जोम, प्रसन्नता, निरोगीपण अशा वेगळ्या कसोट्यांवर आपण निवाडा करतो. व्यक्तित्वाचा विकास : ज्ञान, कर्तृत्व, लौकिक जीवनात व्यावसायिक यश, सिद्धी या अंगाने व्हावा अशी अपेक्षा बाळगतो. पण जर एखादा माणूस केवळ पैसाच कमाविण्याच्या मागे लागला, सत्ता केंद्रित करीत सुटला व त्यात यशस्वीही होत राहिला तर त्याचे कर्तृत्व मान्य करीत असताही आपण असंतुलित, संकुचित व विकृतीकडे झुकणारे व्यक्तित्व म्हणून त्याच्याकडे पाहतो. सात्त्विकतेची व्याख्या, शहाणपणाची संकल्पना, सुसंस्कृततेची कसोटी आपली प्रत्येकाची वेगळी असेल. पण आपल्या कसोटीनुसार, व्याख्येनुसार, संकल्पनेनुसार माणसाने उत्तरोत्तर सात्त्विक, शहाणे व सुसंस्कृत बनावे अशी आपली अपेक्षा असते. समाजाच्या संदर्भातही हीच गोष्ट खरी आहे.

भौतिक वस्तूंच्या उत्पादनात व सेवनात सतत वाढ होत जाणे म्हणजे विकास व समृद्धी, आणि अशी वाढ अमर्यादपणे कायमची होत राहणे म्हणजे आदर्श व्यवस्था, या मान्यतेतील असमंजसपणा व विकृती आज सनातनी, पारंपरिक अर्थशास्त्र्यांनाही उघड होत आहे. अन्य दिशांनी समाजाचा विकास होण्यासाठी आवश्यक तेवढी ऐहिक जीवनाविषयीची निश्चितता आणि भरणपोषणाची पातळी यांना खरे महत्त्व आहे. तसेच, अन्य दिशांनी विकास होण्यासाठी निवान्त सवड मिळायची व त्या प्रकारच्या विकासावर लक्ष व शक्ती एकाग्र व्हायची असेल तर भौतिक वस्तू व सेवा यांच्या उत्पादनात व सेवनात वाढ होण्याचे एका टप्प्यावर जवळपास पूर्णपणे थांबायला हवे. उंची व वजन यांच्या वाढीशी तुल्यबल अशी ही गोष्ट आहे.

विकास व समृद्धी यांच्याविषयीची दृष्टी, या शब्दांचे अर्थ तर बदलायला हवेतच. विकास व समृद्धीची एक श्रेणीही मान्य व्हायला हवी, क्रमशः टप्पे/अवस्था गाठण्याचीही कल्पना करायला हवी. समाजातील सभासदव्यक्तींची वाटचाल, शारीरिक वाढ पूर्ण झाल्यावर, बुद्धी, मन व आत्मतत्त्व यांच्या विकासाच्या दिशेने व्हायला हवी, तशी ती होण्यासाठी अनुकूल भौतिक व आधिभौतिक स्थिती समाजाची निरंतर टिकवून धरणे हे समाजाच्या पातळीवर लक्ष्य राहावयास हवे.

समाजातील यच्चयावत सर्वांच्या, निरपवादपणे, शरीराच्या पूर्ण वाढीच्या व स्वास्थ्याच्या दृष्टीने आवश्यक त्या गरजांची पूर्तता होत राहील इतके उत्पादन निरंतर होत राहील अशी अर्थव्यवस्था उभारण्यास प्राथमिक व पायाभूत महत्त्व आहे. कोणते उत्पादन गरजेचे आहे, कोणते अत्यावश्यक पायाभूत गरजेचे नसले तरी स्वागतार्ह ठरेल आणि कोणते निश्चित अपायकारक व आक्षेपार्ह आहे हा विवेक करावाच लागेल. अत्यावश्यक, स्वागतार्ह, आक्षेपार्ह या सीमारेषा कदाचित बदलत्याही राहतील. पण, मानवी शरीराची रचना स्थिर आहे ही गोष्ट लक्षात घेता, हेही जाणले व स्वीकारले पाहिजे की, त्यांच्यात एक स्थायीपणा आहे. ही स्थायी रेषा ध्यानात ठेवून अर्थव्यवस्थेची उभारणी करणे व ती कार्यरत ठेवणे ही 'चिरस्थायी विकासा'ची भूमिका आहे.

'चिरस्थायी विकासा'च्या प्रचलित मांडणीत निसर्गसृष्टीच्या मर्यादेचा विचार केला जातोच असे नाही. नियतकालिक पुनर्निर्मितिक्षम साधनस्रोतांच्या मर्यादेत विकासाचा वेग राखणे, पर्यावरणाचा समतोल ढासळणार नाही याची सावधानता बाळगणे, या अंगाने अधिक विचार होतो. सावध दक्षता, व्यावहारिक शहाणपण यांचा भाग यात जास्त आहे. भौतिक जीवनमानात, उपभोग व सेवन यांत सतत वाढ करण्याचे

मध्यवर्ती लक्ष्य टिकूनच राहते. निसर्गसृष्टीशी संवादी राहण्याचे व निसर्गसृष्टीच्या धारणक्षमतेच्या मर्यादेत राहण्याचे तत्त्व जर पूर्णपणे मान्य केले तर ह्या अर्थव्यवस्थेला एक चिरंजीवित्व प्राप्त होते. निसर्गसृष्टीत जी गतिमान उत्क्रांतीची प्रक्रिया क्रियाशील आहे तिच्याशी एकरूपत्व साध्य करण्याचे लक्ष्य राहील. गतिमान उत्क्रांतीची प्रक्रिया अखंडित राहणे हाच विकास अशीही नवी व्याख्या असेल. हा 'चिरंजीवी विकास' होय.

इतर प्राण्यांपेक्षा माणूस कोणत्या बाबतीत वेगळा आहे याचा विचार केला तर 'काव्यशास्त्र-विनोदा'च्या निर्मितीची त्याची क्षमता हा जसा विशेष लक्षात येतो, तसे मन व बुद्धी यांच्या पलीकडे जाणारे एक तत्त्व त्याच्या ठायी आहे आणि या तत्त्वात माणसाच्या नैतिकतेचा, सदसद्विवेकाचा उगम आहे.

मानवी जीवन, शरीर, मन व बुद्धी यांच्या पातळीवर राहते तोवर ते 'अपघाती योगायोग व यांत्रिक अनिवार्यता' यांच्या चौकटीतच राहते. इतर सर्व सजीव सृष्टीही याच चौकटीत निर्माण झाली व उत्क्रांत होत आली आहे. या चौकटीला भेदून जाणारे जे तत्त्व माणसात आहे त्यामुळेच त्याच्या ठायी जे कर्तेपण आढळते ते इतर कोणत्या सजीवाच्या ठायी आढळत नाही. जगण्याच्या 'संघर्षा'च्या ओघात प्रकट होते ते कर्तेपण हे वरील चौकटीतलेच आहे. तेथे डार्विनप्रणीत 'नॅचरल सिलेक्शन'ची प्रक्रियाच घडत असते. अक्षरवाङ्मय, कलाकृती, संगीत, तत्त्वचिंतन व विज्ञान यांची निर्मिती ही या तत्त्वाशी–आत्मतत्त्वाशी–निगडित जाहे. रिचर्ड हॉफस्टेटर या संगणक शास्त्रज्ञाने या गूढ आत्मतत्त्वाला उद्देशून 'द माइंड्स आय' (The mind's I) असे म्हटले आहे.

'अहं ब्रह्मास्मि' असे सार्थपणे म्हणू शकणारे आत्मतत्त्व हे, अशा रीतीने, माणसाचे वैशिष्ट्य आहे. चिरंजीवी अर्थव्यवस्था ('पर्मनंट इकॉनॉमी') इष्ट व वांछनीय अशासाठीपण आहे की या अर्थव्यवस्थेच्या चौकटीत या आत्मतत्त्वाच्या आविष्काराला पूर्ण वाव व प्रोत्साहन राहील.

* *

लेखक–परिचय

■ **ब्रह्मदेव शर्मा** : भारतीय प्रशासकीय सेवेतील भूतपूर्व सभासद. सध्या भारत सरकारचे अनुसूचित जाती व जमाती यांसाठीचे आयुक्त. नवसमाजनिर्मितीसाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची 'सहयोग' नावाची संघटना उभी करण्यात पुढाकार. ■ **लक्ष्मी जैन** : १९४७ साली पाकिस्तानमधून आलेल्या निर्वासितांच्या पुनर्वसनाच्या कामात कमलादेवी चट्टोपाध्याय यांचे सहकारी. इंडियन को-ऑपरेटिव्ह युनियन संस्थेत काम. अखिल भारतीय हस्तकला आयोगाचे भूतपूर्व अध्यक्ष. सध्या योजना आयोगाचे सदस्य. ■ **कमला चौधरी** : फोर्ड फाऊंडेशनमधील भूतपूर्व उच्चपदस्थ अधिकारी. नॅशनल वेस्टलँड डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या अध्यक्षा. ■ **माधव गाडगीळ** : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर, येथे सेंटर फॉर थिओरेटिकल स्टडिज व सेंटर फॉर इकॉलॉजिकल स्टडिजमध्ये प्राध्यापक व पर्यावरणीय संरक्षण व संवर्धन या विषयातले पंतप्रधानांचे भूतपूर्व सल्लागार. 'पश्चिम घाट बचाव' योजनेशी संबंध. ■ **वंदना शिव** : भौतिकीशास्त्र व विज्ञानाचे तात्त्विक अधिष्ठान या विषयांचा अभ्यास. रिसर्च फाऊंडेशन फॉर सायन्स, टेक्नॉलॉजी अँड नॅचरल रिसोर्स पॉलिसी, देहरादून (उ. प्र.) या संस्थेच्या संचालिका. ■ **अविनाश जोशी** : बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे, येथे अर्थशास्त्राचे प्राध्यापक. ■ **वसंत पळशीकर** : 'समाजप्रबोधन पत्रिके'चे काही काळ संपादक. विविध सामाजिक–राजकीय विषयांचे आणि समस्यांचे व्यासंगी अभ्यासक. निवास : अ–७, प्राध्यापक निवास, बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर–४१३७०९.

* *